**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. २६४/२००७</u>**

**<u>निशाणी १९१ वरील आदेश</u>**

(<u>दिनांक ०६/०४/२०२१</u>)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. ७ यांनी महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्ट चे कलम ६, ८ ते १४(२) प्रमाणे सादर केला आहे. प्रतिवादी नं. ७ तर्फे त्यांचा स्वतःचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे विधीज्ञ श्री. एन.एस. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी नं. ७ यांनी अर्जात नमुद केलेल्या कथनांव्यतिरिक्त इतरही अनेक गोष्टींचा उल्लेख युक्तीवादात केला. परंतु ती कथने कायदेशीर दृष्ट्या विचारात घेणे योग्य नसल्याने ती नमुद करणे जाणीवपुर्वक टाळत आहे. अर्जातील कथनांपुष्ट्यर्थ प्रतिवादी नं. ७ यांनी असे नमुद केले की, वादीनी दावा वाटपासाठी, हक्कज्ञापनासाठी आणि निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. वादीनी दावा घर मिळकतीचे मुल्यांकन जाणीवपुर्वक कमी दाखवुन न्यायालयाची दिशाभुल करणेकामी मुद्रांक शुल्क कमी भरलेले आहे. या बद्दल प्रतिवादीने दावा मिळकतीचे वर्णन, क्षेत्र, मोजमाप आणि मुल्यांकन याबाबत आक्षेप कैफियतीमध्ये घेतलेला आहे. दावा मिळकतीची सन २००७ मध्ये बाजारभावाप्रमाणे अंदाजे किंमत रु. ५५,००,०००/– ते ६०,००,०००/– होत असताना, वादीनी नाममात्र रु. ३६,०००/– किंमत दर्शवुन न्यायालयीन

शुल्क बुडवणेचा प्रयत्न केला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ७ नियम ११(ब) नुसार प्रतिवादींना दाव्याच्या मुल्यांकनाबाबत आक्षेप नोंदवण्याचा अधिकार आहे. त्यानुसार दाव्याच्या मुल्यांकनाबाबत व वादींनी दिलेल्या मुल्यांकनाबाबत योग्य ती चौकशी करुन वादीना कायद्याप्रमाणे येणारे न्यायालयीन शुल्क भरणेबाबत आदेश करावेत.

३. प्रतिवादी नं. ७ यांनी आपल्या कथनापुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे न्यायनिवाडे सादर केले आहेत.

1) State of Gujarat Vs. Shri. Pradip Kumar Gendalal Shah and others, AIR 1995 GUJARAT 178.
2) G.V. Iyengar and another Vs. A.R. Sampathkumar and others, 2008(3) Mh.L.J. 621.
3) Pushparaj Surajprasad Modh Vs. Sayyad Altaf Sayyad Wazir and others, 2000(4) Mh.L.J. 492.
4) Omprakash V/s Bhagirathibai, 1984 CJ (Bom)449
5) Aninha Dcosta V/s Parvatibai M. Thakur, 1964 CJ (Bom) 7.

४. वादीतर्फे असे नमुद करण्यात आले की, दावा सन २००७ साली दाखल करण्यात आला आहे. त्यावेळी असणारे दावा मिळकतीचे बाजार मुल्य दाव्यात नमुद करुन त्यावर आवश्यक ते न्यायालयीन शुल्क वादीने भरलेले आहे. दाव्याच्या मुल्यांकनाबाबत आणि न्यायालयीन शुल्काबाबत प्रतिवादीनी कैफियतीमध्ये घेतलेल्या आक्षेपानुसार मुद्दा देखील निश्चित करण्यात आला आहे. सद्य स्थितीत वादींचा पुरावा संपला असुन दावा

प्रतिवादींच्या पुराव्यासाठी प्रलंबीत आहे. असे असताना प्रतिवादींची कथने सक्षम पुराव्याआधारे शाबीत करणेची संधी प्रतिवादी नं. ७ यांना पुरावा देऊन मिळणार आहे. मुल्यांकनाबाबत आपण घेतलेले आक्षेप कशा प्रकारे बरोबर आहेत, हे देखील प्रतिवादी पुराव्याद्वारे दाखवुन देऊ शकतात. त्या करीताचा मुद्दा निश्चित करण्यात आला आहे. असे असताना केवळ दाव्याची सुनावणी लांबवण्यासाठी प्रतिवादीनी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज सद्य स्थितीत नामंजुर करावा अशी विनंती त्यांनी केली.

५. वादी प्रतिवादींची परस्परविरोधी कथने विचारात घेत दाव्याचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा घर मिळकतीच्या वाटपासाठी, निरंतर ताकीदीसाठी आणि मृत्युपत्र आपल्या हिश्श्यावर बंधनकारक नाही या हक्कज्ञापनासाठी केलेला आहे. या कामी मुद्दे (नि.४८) सर्व प्रथम दिनांक १०/०९/२००८ रोजी निश्चित करण्यात आले. त्यानंतर दिनांक १२/०७/२०१६ रोजी मुद्दे पुर्ननिश्चित करण्यात आले. त्यामध्ये मुद्दा क्र. ८ दावा मिळकतीचे मुल्यांकन कमी करण्यात आले आहे किंवा कसे या अनुषंगाने निश्चित करण्यात आलेला आहे. वादीने आपल्या तर्फे दोन साक्षीदारांचा पुरावा नोंदवुन दिनांक ०५/०३/२०२१ रोजी पुरशीस (नि.१७७) द्वारे पुरावा बंद केला आहे. त्यानंतर दिनांक १२/०३/२०२१ पासुन दावा प्रतिवादी नं. ५, ७, १० व ११ यांच्या पुराव्यासाठी नेमण्यात आला. त्यानंतर दिनांक १९/०३/२०२१ रोजी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. ७ यांनी सादर केला आहे.

६. त्या अर्जामध्ये प्रतिवादी नं. ७ यांनी घेतलेले आक्षेप दावा मिळकतीचे मुल्यांकन आणि त्याआधारे भरलेले न्यायालयीन शुल्क या अनुषंगाने आहे. या बाबतचा आक्षेप प्रतिवादींनी आपल्या कैफियतीमध्ये घेतला असल्यामुळे त्या अनुषंगाने मुद्दा नं. ८ निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे दावा मिळकतीच्या मुल्यांकनाबाबत व न्यायालयीन शुल्काबाबत प्राथमीक चौकशी करण्याची आवश्यकता सद्य स्थितीतीमध्ये राहीलेली नाही. दावा मिळकतीचे मुल्यांकन वादीने कशा पध्दतीने कमी केले व दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीचे बाजार मुल्य निश्चित किती होते, हे पुराव्यासह दाखवुन देण्याची जबाबदारी निश्चितच प्रतिवादी नं. ५, ७, १० आणि ११ यांची आहे. त्यांनी योग्य पुराव्यानिशी सदरची बाब शाबीत केल्यास दाव्याच्या अंतीम निकालाच्या वेळीदेखील वादींना न्यायालयीन शुल्क भरणे बाबतचे आदेश देता येऊ शकतात. तसेच दाव्याच्या अंतीम निकालावेळी कदाचीत असे आढळुन आले की, वादीने जाणुनबुजुन दावा मिळकतीचे मुल्यांकन कमी दर्शवले आहे व न्यायालयीन शुल्क कमी भरले आहे, त्यावेळी जरी दावा मंजुर झाला तरी निश्चितच कमी भरलेले न्यायालयीन शुल्क भरणे बाबतचे आदेश वादीना देता येऊ शकतात. ही सर्व परिस्थिती तेव्हा उद्भवणार आहे जेव्हा प्रतिवादी दावा मिळकतीच्या मुल्यांकनाबाबतचे आपले कथन आपल्या पुराव्याद्वारे शाबीत करतील. त्यामुळे सद्य स्थितीमध्ये प्रतिवादीने घेतलेले आक्षेप योग्य ठरत नाही. या आक्षेपाबाबत दाव्याच्या अंतीम निर्णयावेळी देखील विचार करता येईल. प्रतिवादींनी आपल्या कथनांपुष्ट्यर्थ सादर केलेले न्यायनिवाडे देखील अंतीम निर्णयावेळी लागु होऊ शकतील.

७.	या ठिकाणी हे आवर्जुन नमुद करणे आवश्यक आहे की, दावा सुमारे १४ वर्षे जुना असुन मा. उच्च न्यायालय मुंबई आणि मा. जिल्हा न्यायालय सांगली यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार दाव्याची सुनावणी लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी न्यायालय प्रयत्नशील आहे. याकरीता वादी, प्रतिवादी आणि त्यांच्या विधीज्ञांनी देखील न्यायालयास सहकार्य करणे अपेक्षीत आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. ५, ७, १० व ११ यांनी पुढील तारखेस आपला पुरावा न चुकता सादर करणे बाबतचा आदेश देणे देखील रास्त ठरेल. या चर्चेअंती खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. सद्य स्थितीत अर्ज फेटाळला.

२. अर्जातील आक्षेपाबाबत अंतीम निर्णयाच्या वेळी योग्य ते आदेश करण्यात येतील.

३. प्रतिवादी नं. ५, ७, १० आणि ११ यांनी पुढील तारखेस न चुकता आपला पुरावा सादर करावा.

४. अर्जाचा खर्च अर्जदाराने सोसावा.
(पक्षकार व विधीज्ञांच्या उपस्थितीत खुल्या न्यायालयात जाहीर केला.)

सही/–
(भूषण र. ठाकूर)
दिनांकः ०६/०४/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.